# विशेष दिवाणी दावा क्र. १४५/२०१८ मधील निशाणी क्रमांक २९ वरील आदेश

## (प्रदिप उर्फ सचिन तुकाराम कदम वि. अभिजित चव्हाण)

## (**CNR No.MHSN**020012592018)

१. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(अ)व(ड) प्रमाणे वादींचा दावा दाखल करण्यास कारण काय घडले हे नमूद केले नाही, तसेच वादींचा दावा हा त्यातील मजकूरावरुन चालण्यास कायदयाने प्रतिरोधीत ठरतो या कारणास्तव फेटाळण्याची मागणी प्रतिवादी यांनी केलली आहे.

२. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी वादींविरुध्द फौजदारी केस क्रमांक ४७७/२०१४ दाखल केलेली होती. सदरहु केसचे कामी पुराव्यादरम्यान उलटतपासामध्ये वादी यांची बदनामी होईल असे प्रश्न सुचविण्यात आले. त्यामुळे सदरची केस काढुन टाकल्यानंतर वादी यांनी त्यांच्याविरुध्द नुकसानभरपाईचा दावा दाखल केलेला आहे. परंतु, अशाप्रकारे उलटतपासात एखादे प्रश्न सुचविण्यात आले म्हणुन वादींची बदनामी झाली असे कायदयाने ठरत नाही. तसेच, त्यासंदर्भात दावा करण्याची कायदयामध्ये कोणतीही तरतुद नाही. तसेच, वादींनी केलेला दावा हा मुदतीत नाही. त्यामुळे तो फेटाळण्यात यावा असे प्रतिपादन प्रतिवादी यांनी केलेले आहे.

३. सदरहु अर्जाला अनुसरुन वादी यांनी नि.क्र.३२ कडे त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे फौजदारी केस क्रमांक ४७७/२०१४ च्या निकालानंतर त्यांनी विहीत मुदतीत दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा दावा कसा कायदयाने नाही हे प्रतिवादी यांनी अर्जात कोठेही कथन केलेले नाही. तसेच, वादी यांनी दावा कोणत्या कारणास्तव दाखल केलेला आहे याचे कारण मुळ दाव्यात नमुद केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी चुकीचा अर्ज दिलेला आहे असे प्रतिपादन करुन अर्ज फेटाळण्याची मागणी वादी यांनी केलेली आहे.

४. प्रतिवादी व वादी यांच्या परस्परविरोधी कथनावरुन, खालील मुद्दे विचारार्थ घेतले, त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही व कोणते कारण घडले हे दाव्यात नमूद केलेले नाही, ही बाब प्रतिवादी यांनी शाबीत केली आहे का ? | नकारार्थी |
| २. | दाव्यातील कथनांवरुन दावा हा चालण्यापासून कायदयाने प्रतिरोधीत करण्यात आलेला आहे, ही बाब प्रतिवादी यांनी शाबीत केली आहे का ? | नकारार्थी . |
| ३. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करीता –**

**५.** अर्जाला अनुषंगून मूळ दाव्याचे अवलोकन केले. उभय बाजूंचा युक्तीवाद ऐकला. तसेच उभयंतानी युक्तिवादाव्यतिरिक्त कोणताही साक्षीपुरावा दयायचा नाही असे तोंडी प्रतिपादन केले.

**६.** वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द फौजदारी केस क्रमांक ४७७/२०१४ दाखल केलेली होती. सदरहु केस दिनांक ०१/०८/२०१७ रोजी फेटाळण्यात आली. सदरहु केसमुळे वादी यांना मानसिक त्रासास व बदनामीस सामोरे जावे लागले. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांना दिनांक २४/११/२०१७ रोजी नोटीस पाठविली व १०,००,०००/– रुपये नुकसानभरपाईची मागणी केली. सदरहु नोटीसीला प्रतिवादी यांनी दिनांक ०४/०१/२०१८ रोजी उत्तर पाठवले. त्यानंतर वादी यांनी प्रस्तुतचा दावा फौजदारी केस क्रमांक ४७७/२०१४ दिनांक ०१/०८/२०१७ रोजी फेटाळल्यानंतर विहीत मुदतीत नुकसानभरपाई मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे वादी यांनी कोणत्या कारणास्तव दावा दाखल केलेला आहे हे दाव्यामध्ये परिच्छेद क्रमांक ९ मध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. तसेच, सदरचा

दावा हा मुदतीत देखील आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

७. अर्जाला अनुषंगून प्रतिवादी यांनी नामदार पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालय उच्च न्यायालय यांचा ***ICICI Bank Ltd., Vs. Kusum Agrawal*** हा न्यायनिर्णय दाखल केलेला आहे. सदरहु न्यायनिर्णयामध्ये केवळ एखादया केसमध्ये आरोपीविरुध्द केस शाबीत होत नाही असा कोर्टाने निष्कर्ष नोंदवला म्हणुन त्या आरोपीला अब्रुनुकसानीची केस प्रतिवादीविरुध्द दाखल करण्याचे हक्क प्राप्त होत नाहीत असे नमुद केलेले आहे.

तसेच, प्रतिवादी यांनी नामदार दिल्ली उच्च न्यायालय यांचा ***Nau Nihalsing Rana Vs. Sunil Kuma***r हा न्यायनिर्णय अवलोकनार्थ दाखल केलेला आहे. सदरहु न्यायनिर्णयामध्ये एखादया व्यक्तीने फौजदारी केसमध्ये उलटतपासामध्ये काही विधाने केली तर त्याचा उपयोग नुकसानभरपाईची केस करण्यासाठी केला जात नाही असे नमुद केलेले आहे.

प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या उच्चतम न्यायालय यांच्या न्यायनिर्णयांचा मी अत्यंत आदर राखतो. परंतु, प्रस्तुत केसमध्ये वादी हे प्रतिवादीविरुध्द विशिष्ट केस घेऊन कोर्टात आलेले आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ नियम ११ प्रमाणेचा अर्ज विचारार्थ घेत असताना, कायदयाच्या महत्वाच्या तत्वाप्रमाणे वादी यांनी त्यांच्या दाव्यामध्ये काय नमुद केले आहे इतकीच बाब विचारात घेणे आवश्यक असते. वादींच्या दाव्याला अनुषंगून प्रतिवादी यांनी कोणते बचाव घेतलेले आहेत याचा विचार दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ नियम ११ प्रमाणेचा अर्ज विचारार्थ घेत असताना करणे कायदयाला अभिप्रेत नाही.

८. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द फौजदारी केस क्रमांक ४७७/२०१४ अशी पराक्रम्य अधिनियम १३८ प्रमाणे दाखल केलेली होती. सदरची प्रतिवादी यांनी दाखल केलेली फिर्याद दिनांक ०१/०८/२०१७ रोजी

फेटाळण्यात आली. त्यानंतर वादी यांनी प्रतिवादी यांना दिनांक २४/११/२०१७ रोजी नोटीस पाठवुन नुकसानभरपाई मिळण्याची मागणी केली. परंतु, सदरची वादी यांची मागणी प्रतिवादी यांनी धुडकावुन लावल्यानंतर त्यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

त्यामुळे वादी यांच्या दाव्यातील मांडणीवरुन, सदरहु दावा हा फौजदारी केस क्रमांक ४७७/२०१४ दिनांक ०१/०८/२०१७ रोजी फेटाळल्यानंतर विहीत मुदतीत दाखल केलेला आहे असे दिसुन येते. त्यामुळे वादीच्या दाव्यास प्रथमदर्शनी मुदतीच्या कायदयाची बाधा येते असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादींचा दावा हा मुदतीच्या कायदयाविरुध्द दाखल करण्यात आलेला आहे ही बाब प्रतिवादी यांना प्रथमदर्शनी शाबीत करता आलेली नाही.

९. यापुर्वीच विस्तृतपणे कथन केल्याप्रमाणे फौजदारी केस क्रमांक ४७७/२०१४ केवळ फेटाळली म्हणुन वादी यांनी नुकसानभरपाईची मागणी केली आहे किंवा त्यांची खरोखरच सदरहु केसमुळे बदनामी झाली वगैरे बाबी या पुराव्याअंती शाबीत होणार आहेत. त्यामुळे वादींच्या दाव्यातील कथनांवरुन वादी यांनी दावा दाखल करण्यास कोणते कारण घडलेले आहे हे स्पष्टपणे दावा परिच्छेद क्रमांक ९ मध्ये नमुद केलेले आहे. त्यामुळे वादींचा दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही, किंबहुना वादी यांनी ते कारण उघड केलेले नाही हा प्रतिवादी यांनी घेतलेला आक्षेप प्रथमदर्शनी स्वीकारण्यायोग्य नाही.

१०. प्रतिवादी यांनी जे न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत, त्यामध्ये नमुद केलेली वस्तुस्थिती व प्रस्तुत केसमधील वस्तुस्थिती ही प्रथमदर्शनी एकमेकांशी सुसंगत दिसुन येत नाही. निर्विवादपणे, प्रतिवादी यांनी वादींविरुध्द फौजदारी केस केलेली होती व ती फेटाळण्यात आलेली होती असे प्रथमदर्शनी उभयंताना मान्य आहे असे दिसुन येते. त्यामुळे सदरची केस प्रतिवादी यांनी दाखल केल्यामुळे वादी यांची बदनामी झालेली होती असे कारण नमुद करुन वादी यांनी जी नुकसानभरपाईची मागणी केलेली आहे ती

प्रथमदर्शनी कोणत्या कारणास्तव आहे व ती मुदतीच्या कायदयाविरुध्द आहे असे गृहीत धरता येणार नाही.

**११.** त्यामुळे वादी यांनी दावा कोणत्याही कारणास्तव दाखल केलेला आहे व दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही ही प्रतिवादी यांनी उपस्थित केलेली तक्रार त्यांना प्रथमदर्शनी शाबीत करता आलेली नाही. तसेच, वादींच्या दाव्याच्या मांडणीवरुन सदरहु दावा हा प्रथमदर्शनी मुदतीत नाही असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादींच्या दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ नियम ११–अ व ११–ड ची बाधा येते ही बाब प्रतिवादी यांना शाबीत करता आलेली नाही. सबब मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो.

**१२.** मुद्दा क्र.१ व २ चा साकल्याने विचार करता वादींचा दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ नियम ११ (अ) व (ड) प्रमाणे काढून टाकण्याची प्रतिवादींची मागणी स्वीकारण्यास पात्र ठरत नाही. सबब आदेश खालीलप्रमाणे.

## आदेश

१. प्रतिवादी यांचा नि.क्र.२९ कडील अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

३. उभय पक्षकारांनी हुकूमाची नोंद घ्यावी.

(आदेश न्यायालयासमोर घोषीत केला.)

**सांगली.** **(अ. अ.मेहेंदळे)**

**दिनांक ०२/०१/२०२४** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | आर.व्ही.जाधव |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | ०२/०१/२०२४ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | - | ०२/०१/२०२४ |